रे.क.नं.६६/२०१७

मे.दिवाणी न्यायाधिशसो, क.स्तर, कळे-खेरीवडे

यांचे कोर्टात...

श्रीपती महादेव आडनाईक वगैरे - वादी

विरुध्द

तुकाराम बिरु धनगर वगैरे - प्रतिवादी

**भारतीय मुदत कायदा कलम ५ विलंब माफ होवून मिळणेसाठी अर्ज-**

**यातील वादी नं. १ तर्फे विनंती अर्ज की,**

१. यातील वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द कायम मनाईसाठी या मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत कामातील वादी क्र. ४ श्री.आकाराम काजू माने हे दि. २५/०६/२०१३ इ.रोजी मयत झाले आहेत. सदर कामी वादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी तांत्रिक दृष्टया ११ वर्षे ११ महीने १६ दिवसांचा विलंब झाला आहे.

वादी क्र. ५ श्री.पंडित बंडू पोवार हे दि.१५/०३/२०२० इ.रोजी मयत झाले आहेत. सदर कामी वादी क्र. ५ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी तांत्रिक दृष्टया ०५ वर्षे ०२ महीने २५ दिवस दिवसांचा विलंब झाला आहे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

वादी क्र. ७ श्री.बळवंत दत्तात्रय पाटील हे दि. १६/११/२०१८ इ.रोजी मयत झाले आहेत. सदर कामी वादी क्र. ७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी तांत्रिक दृष्टया ०६ वर्षे ०६ महीने २४ दिवस दिवसांचा विलंब झाला आहे.

३. वादी क्र. ४, ५ व ७ हे मयत झाले नंतर कायद्याने ९० दिवसाचे आत वारसांची नोंद करावी लागते याची माहीती इतर वादींना नव्हती तसेच वादी नं. ४ हा मयत झालेनंतर मुळ दावा पन्हाळा कोर्टातुन कळे कोर्टात वर्ग झाला आहे सदरचा दावा वर्ग झालेनंतर वादी नं.५ व ७ हे मयत झाले आहेत. सदरचा दावा पन्हाळा कोर्टातुन वर्ग झालेनंतर आम्हा वादी पैकी कोणीच कळे कोर्टातील कामकाजामध्ये हजर नव्हतो त्यामुळे सदरचा दावा मे. कोर्टानी कोणीही कामकाज चालवत नसलेने काढून टाकला होता त्यानंतर मी व इतर काही वादी यांचे वतीने दावा फेर फैलाव घेणेसाठी अर्ज केला होता. सदरचा अर्ज फेरफैलावर घेणेसाठी आदेश झाला व त्यानंतर अलिकडेच दावा फेर फैलाव घेणेत आला आहे अशी सर्व परिस्थिती असलेने सदरच्या कामाकाजाबाबत बराच कालात्रधी गेला आहे. त्यामुळे वादी नं. ४, ५ व ७ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणता आलेले

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

नाहीत. या वादींनी जाणुन बुजुन सदरचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब केलेला नाही.

४. वादी क्र. ४, ५ व ७ चे वारस रेकॉर्डवर आणले नाही तर सर्व वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. उलट विलंब माफ होऊन मयताचे वारस रेकॉर्डवर आलेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही व नैसर्गिक न्यायदानास मदत होणार आहे.

**५. तरी, वादीची विनंती की,**

वादीचा सदरचा अर्ज मंजुर व्हावा व वादी क्र. ४, ५ व ७ याचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ व्हावा.

कळे-खेरीवडे

दि. ०९/०९/२०२५

वादी नं. १

**प्रतिज्ञा**

मी वादी नं.१ श्रीपती महादेव आडनाईक, व.व.६९, धंदा - शेती रा. यवलुज, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीनुसार खरा असुन बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कळे-खेरीवडे

दि. ०९/०९/२०२५

वादी नं. १

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

## ॲफिडेव्हिट

मी वादी नं.१ श्रीपती महादेव आडनाईक, व.व.६९, धंदा - शेती रा. यवलुज, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर देवाशपथ कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजूतीप्रमाणे खरा असुन बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मु. कळे-खेरीवडे दि. ०९/०९/२०२५

मी ॲफिडेव्हिट करणार यांना ओळखतो.

अॅड.के.बी.देसाई

वादी नं. १

O

Perused the application. View of say filed by def. Considering the relief deny is hereby condoned. Inspect of LR's of def No 4 r f 7 mad

### प्रतिज्ञा

मी वादी नं.१ श्रीपती महादेव आडनाईक, व.व.६९, धंदा - शेती रा. यवलुज, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीनुसार खरा असुन बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कळे-खेरीवडे

subject to costs of Rupees 1000/- be given to def. No 1. mad

दि. ०९/०९/२०२५

वादी नं. १

श्रीपती महादेव आडनाईक

9/9/25 CJJD

Solemnly affirmed before me by

Shri./Smt. Shripati Mahadev Adnaik

Age 69 yrs Occup Agri at Yavluj Tal. Panhala

who is identified by Adv. Shri./Smt. K. B. Desai Whom I know personally

Date:- 09/09/2025

Assistant Superintendent